# के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन महाविद्यालय, नाशिक-०३.

दि. ०३/०१/२०२०

## <u>नोटीस</u>

मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या परिपत्रकानुसार दि. १ जानेवारी ते २० जानेवारी २०२० या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करावयाचा आहे. त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील खालील कर्मचाऱ्यावर सदर जबाबदारी देण्यात आली आहे.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

१) व्याख्यान आयोजित करणे - प्रा. एन. एम. शहाणे

२) निबंध स्पर्धा आयोजित करणे - प्रा. वैशाली लेले

३) संवाद लेखकांशी कार्यक्रमाचे आयोजन - प्रा. सुनील कुटे

४) ग्रंथ प्रदर्शन आयोजन करणे - श्री. प्रकाश बोडके

५) मराठी भाषिक व्यक्तीचा सत्कार / मुलाखत - प्रा. प्रमोद शहाबादकर
प्रा. नानासाहेब गुरुळे

६) मराठी विकिपीडिया - प्रा. स्नेहल कमलापूर

आपल्या महाविद्यालय मार्फत १ जानेवारी ते १५ जानेवारी २०२० ह्या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा केल्याबाबतचा अहवाल पाठविण्याची जबाबदारी श्री.प्रकाश बोडके (ग्रंथपाल) यांची असेल. त्यांनी संबंधीत सर्व कार्यक्रम अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरवावी व अहवाल अहवाल संकलीत करून (www.unipue.ac.in-Students' development-BSD Online -College Login - For Colleges Users- Login-Main Menu-Students- Development- Menu-Gov/Institute joint scheme proposal report-Other joint scheme proposal report Create New Application- योजना निवडा - मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल) येथे दि. २०/०१/२०२० पर्यंत प्राधान्याने भरण्याबाबत सूचना देण्यात येत आहे.

KNandurkar

प्रा. डॉ. के.एन. नांदूरकर
प्राचार्य

सोबत:- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे परिपत्रक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. संतोष परचुरे
संचालक


संदर्भ क्र. विविमं/२०१९–२०/६९८ दिनांक : १८/१२/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग

विषय : दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी, २०२० या कालावधीत ''मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'' साजरा करणेबाबत.

संदर्भ क्र. : महाराष्ट्र शासन पत्र क्र.मभापं–२०१९/प्र.क्र.९३/भाषा–२, दिनांक ०३ डिसेंबर, २०१९

महोदय/महोदया,

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेच्या संवर्धनासाठी व भाषेचा सार्वत्रिक वापर होण्यासाठी राज्यभर प्रतिवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी ''मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'' म्हणून साजरा करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्रमांक मभापं–२०१५/प्र.क्र.७०/भाषा–२, दिनांक २२ जुलै, २०१५ च्या शासननिर्णयान्वये घेतला आहे.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने राज्यभर दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी, २०२० या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात यावा, असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त संस्थेत/सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर विभागांमध्ये शासनाच्या उपरोक्त संदर्भीय परिपत्रकातील परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केल्यापैकी सुयोग्य अशा कार्यक्रमांचे ०१ जानेवारी ते १५ जानेवारी, २०२० या कालावधीत आयोजन आपल्यामार्फत अतिशय काटेकोरपणे व्हावे, असे निर्देशित केले आहे. याबाबतचे शासनाचे परिपत्रक आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडत आहे. परिपत्रकात निर्देशित केल्यानुसार आपल्या महाविद्यालयात/मान्यताप्राप्त परिसंस्थेत/पदव्युत्तर विभागात मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात विविध सुयोग्य अशा कार्यक्रमांचे/उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागामध्ये दिनांक ०१ जानेवारी ते १५ जानेवारी, २०२० ह्या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केल्याबाबतचा आपला अहवाल **(www. unipune.ac.in – Students' Developement – BSD Online – College Login –For College Users – Login – Main Menu – Students Developement – Menu – Gov/Institute joint scheme proposal report – Other joint scheme proposal report – Create New Application– योजना निवडा–मराठी भाषा संवर्धन पंधरवडा अहवाल)** येथे दि. २०/०१/२०२० **पर्यंत** प्राधान्याने भरण्याबाबत संबधितांना सूचित करण्यात यावे.

याबाबत विद्यार्थी कल्याण अधिकारी आणि महाविद्यालये, परिसंस्था व विद्यापीठ विभागांतील इतर शिक्षकांनाही कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार सहभागी करून घेऊन जबाबदारी निश्चित करावी. कळावे, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे.

Parchure

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

Lib
KK